सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, टेलिकॉम बिल्डिंग नं २,
महात्मा गांधी रॉड, फाउंटन, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२०८२६४९८ ई-मेल : dytccomp.tpt-mh@gov.in


क्र.पआका/का-११/HSRP/२०२५/जा.क्र ९७३४ **दिनांक : १४.०८.२०२५**

## परिपत्रक क्र. ५५/२०२५

**विषय :** दि.०१/०४/२०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (HSRP) बसविण्याबाबत.

**संदर्भ :** १.) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.६८/२०२४/पआका/का.११/२०२४/ जा.क्र १४८७९, दि. २३.१२.२०२४.

२.) या कार्यालयाचे परिपत्रक क्र १८/२०२५/पआका/का-११/HSRP/२०२५/जाक्र ३५२५ दिनांक २०.०३.२०२५

३.) या कार्यालयाचे परिपत्रक क्र ३७/२०२५/पआका/का-११/HSRP/२०२५/जाक्र ६५६१ दिनांक ०२.०६.२०२५

४.) या कार्यालयाचे परिपत्रक क्र ४२/२०२५/पआका/का-११/HSRP/२०२५/जाक्र ७३५२ दिनांक २०.०६.२०२५

दि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) दि.३१/०३/२०२५ पर्यंत बसविण्याचे निर्देश देण्यात आले होते. जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी संदर्भीय परिपत्रक क्रमांक ३ अन्वये १५.०८.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, खालील कारणास्तव दि.०१.०४.२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे :

१. अनेक जुन्या वाहनांवर HSRP बसविणे बाकी आहे.
२. शहरी भागामध्ये काही वाहन मालकांना पुढील महिन्यात HSRP बसविण्याची अपॉइंटमेंट मिळाली आहे.
३. राज्यातील ग्रामीणभागात फिटमेन्ट केंद्र उघडण्यास उशीर झाला आहे.
४. राज्यातील काही फिटमेन्ट केंद्र बंद पडली असल्याचे निदर्शनास आले आहे.
५. लोकप्रतिनिधी व जनतेकडून HSRP बसविण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी प्राप्त झाली आहे.

सबब दि. ०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना HSRP बसविण्यासाठी **दिनांक ३०.११.२०२५ पर्यंत** अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर दि. ०१.१२.२०२५ पासून उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (HSRP) न बसविणाऱ्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

यानंतर HSRP न बसविणाऱ्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तथापि, दिनांक ३०.११.२०२५ पर्यंत HSRP बसविण्यासाठी पुढील अपॉइंटमेंट मिळालेल्या वाहन मालकांवर कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

संदर्भीय परिपत्रक क्र. ३ नुसार HSRP न बसविणाऱ्या वाहन मालकांचे वाहन हस्तांतरण, कर्जबोजा चढविणे, कर्जबोजा उतरविणे इत्यादी कामांवर आधीच निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यापुढे HSRP न बसविलेल्या वाहन मालकांच्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण इत्यादी सर्व कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) थांबविण्यात येतील. तसेच वायुवेग पथकामार्फत वाहन तपासणीमध्ये जप्त केलेल्या वाहनांना HSRP लावल्याशिवाय सोडण्यात येणार नाही.

तरी, सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात या निर्णयाबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. तसेच स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा /टॅक्सी /बस /ट्रक संघटनांची बैठक घेऊन याबाबत सर्वांना अवगत करावे. HSRP बसविण्याकरिता जनतेच्या काही तक्रारी असल्यास dytccomp.tpt-mh@gov.in या ई-मेल वर पाठविण्यात याव्या.

(विवेक भीमनवार)
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रती:-** १. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना उचित कार्यवाहीस्तव.
२. संबंधित सेवापुरवठादार एजन्सी यांना उचित कार्यवाहीस्तव.
३. कार्यालयीन नस्ती.

**प्रत :-** १. मा. अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय यांना माहितीस्तव.